महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**पीआर-३/सबसिडी/१०८३६** **दिनांक : ०२/०४/२०१४**

## वाणिज्य परिपत्रक क्र. २२२

**विषय :-** **राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च २०१४ या कालावधीमध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे शेती/फळ पिकांचे झालेल्या नुकसानीकरिता आपदग्रस्त शेतक-यांना विशेष पॅकेजद्वारे वीज बिलात सूट देण्याबाबत.**

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण २०१४/प्र.क्र.७२/ऊर्जा-५ दि. २७.३.२०१४.

राज्यात फेब्रुवारी - मार्च २०१४ या कालावधीमध्ये गारपीट व अवेळी पाऊस यामुळे मोठया प्रमाणात जीवित व वित्तहानी झालेली आहे. या गारपीटीमुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामध्ये बाधित झालेल्या शेतक-यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासना मार्फत वरील संदर्भिय शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने एक विशेष पॅकेज जाहिर करण्यात आलेले आहे. त्या नुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय जाहिर केलेला आहे.

**"बाधित शेतक-यांची जानेवारी ते जून २०१४ या कालावधीची वीज देयके राज्य शासनामार्फत भरण्यात येतील."**

वरील निर्णयाच्या अनुषंगाने, विद्युत अधिनियम-२००३ च्या कलम-६५ अन्वये बाधित शेतक-यांना देण्यात येणा-या नुकसानीपोटी शासनाकडून महावितरण कंपनीस अग्रीम अनुदान मिळण्याच्या अधीन राहून शासनातर्फे खालील निर्देश निर्गमित करण्यात आले आहे.

१) महावितरण कंपनीच्या स्थानिक अधिका-यांनी जिल्हा अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडून पंचनामे करुन साक्षांकित केलेल्या बाधित शेतक-यांची अधिकृत नावे प्राप्त करुन घ्यावीत.

२) अशा बाधित शेतक-यांपैकी वीज ग्राहक असलेल्या शेतक-यांची जानेवारी २०१४ ते जून २०१४ या कालावधीतील वीज देयकांचा भरणा राज्य शासनामार्फत करण्यात येईल.

३) अशा बाधित कृषीपंप ग्राहकांची माहिती खालील तक्त्यात वाणिज्य विभागास तात्काळ पाठविण्यात यावी. जेणेकरुन सदर माहिती एकत्रित स्वरुपात शासनास सादर करण्यात येईल.

| अ.क्र. | बाधित शेतक-यांचे महसुल यादीतील नांवे | बाधित शेतक-यांचा वीज ग्राहक क्र. | बाधित शेतक-यांचे जानेवारी ते मार्च २०१४ चे वीज बिल देयकाची रक्कम | बाधित शेतक-यांचे एप्रिल ते जून २०१४चे वीजबिल देयकाची रक्कम | एकूण (४+५) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

४) सदर सवलत जानेवारी २०१४ ते जून २०१४ या कालावधीपुरतीच मर्यादित राहिल. या खेरीज इतर कालावधीतील वीज देयके अथवा थकबाकीचा भरणा बाधित कृषी ग्राहकांना करणे बंधनकारक राहिल.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांशी संपर्क साधून बाधित शेतक-यांची अधिकृत माहिती प्राप्त करुन वरील शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

सर्व संबंधित मंडल कार्यालयांनी अशा बाधित शेतक-यांची माहिती वरील प्रमाणे ग्राहक क्रमांकासह संकलित करुन दिनांक १०.४.२०१४ पुर्वी माहिती व तंत्रज्ञान विभागास द्यावी जेणेकरुन बाधित शेतक-यांना शासनाच्या सवलतीचा लाभ वीज देयकात देता येऊ शकेल. बाधित शेतक-यांशी वस्तुनिष्ठ एकत्रित माहिती देय अनुदानाच्या रक्कमेची मागणी करण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सादर करावी.

मुख्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून राज्याची वस्तुनिष्ठ एकत्रित माहिती संकलित करुन ३) मध्ये दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे वाणिज्य विभागास देण्यात यावी जेणेकरुन अनुदान देय रक्कमेची मागणी शासनाकडे सादर करण्यात येईल.

02/4/14

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रति सस्नेह रवाना :</u>**

**मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण,**
---- सर्व मंडल कार्यालयांशी समन्वय साधून वरील तक्त्यामधील माहिती एकत्रित स्वरुपात कृपया वाणिज्य विभागास पाठविण्यात यावी.

**प्रत रवाना : प्रेषण यादी प्रमाणे**

E:\Documents and Settings\admin\My Documents\Vaze\AE(B)\Circular (Garpit).doc